.. samateche.n he.n tuphaana uThale.n ..

# ॥ समतेचें हें तुफान उठलें ॥

ऊठ ऊठ सह्याद्रे घुमवित बोल मराठी खडे
समतेचें हें तुफान उठलें उठले सागरकडे ॥ धृ.॥

हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी
शिवबानें तरवार घासली याच मराठीवरी
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे ॥ १॥

टिळक गोखले फुले रानडे आगरकर-वैखरी
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी
ह्या ज्योतीवर दीप पेटवा चला भविष्याकडे ॥ २॥

स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे
तेच मराठे आम्ही आम्ही सह्याद्रीचे सुळे
स्वराज्यांतुनी पुढें चला रे चला सुराज्याकडे ॥ ३॥

दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्र अंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा
वीज माळुनी वेणीवरतीं त्याही घुसल्या पुढें ॥ ४॥

ऊठ खेडुता पुन्हां एकदा झाडुनियां घोंगडी
ऊठ मजूरा पुन्हां मारण्या आघाडीवर उडी
एकजूट ही पाहुन पडतिल अन्यायाला तडे ॥ ५॥

विंदा करंदीकर

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999